



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२८ जुलै २०२५



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, धाराशिव :** धाराशिव तालुक्यातील पवारवाडी पाटी ते मुळेवाडी या अर्धा किलोमीटर रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडलेले असुन सदरील रस्ता अतिशय चिखलमय व खराब झाला आहे.त्या मुळे सार्वजनिक बांधकाम विभाग धाराशिव यांनी तात्काळ लक्ष देऊन शाळेच्या विद्यार्थ्यांची गैरसोय थांबवावी अशी मागणी नागरिकांतुन होत आहे.

## ‘दैनिक अक्षराज’च्या बातमीची दखल !

### महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या पाठपुराव्याला यश...

### खासिम पुरा रस्त्याचे काम सुरु !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, उदगीर (लातुर) :** खासिमपुरा जळकोड रोड व वार्ड क्र. ४ या परिसरातील नागरिकांना गेल्या कित्येक महिन्यांपासून खड्ड्यांनी चिखलानी भरलेल्या रस्त्यामुळे रोज त्रास सहन करावा लागत होता. ’दैनिक अक्षराज अचुक वेध अचुक बातमी ने १५ जुलै च्या अंकात निवेदन देवन सुध्दा काम होत नाही या मथळ्याखाली या समस्येची सविस्तर बातमी प्रकाशित केली होती. त्या बातमीची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या तालुकाध्यक्ष सिकंदर शेख यांनी नगरपालिका व आमदारांकडे वारंवार पाठपुरावा करून निवेदने दिली होती. या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर प्रशासनाने मुरूम टाकून रस्त्याची दबई करण्याचे काम सुरू केले आहे.

सदर मार्गावरून जाणाऱ्या वृद्ध नागरिकांना, विद्यार्थ्यांना व रोजच्या कामावर जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात तर रस्त्यावरून चालणे कठीण झाले होते.अखेर जनतेच्या आवाजाला प्रतिसाद मिळाला असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, कर्मचारी, तसेच सुनील कटके यांचे विशेष आभार महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहेत.तालुकाध्यक्ष सिकंदर शेख म्हणाले की, ‘हे केवळ सुरुवात आहे. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही सातत्याने आवाज उठवत राहू.‘दैनिक अक्षराज अचुक वेध अचुक बातमी च्या लोकहितवादी पत्रकारितेची ही आणखी एक परिणामकारक नोंद !

## आरोग्य सेवेतील मोठी क्रांती!

### नागपूर शहरात सुईशिवाय इंजेक्शन देण्याची प्रणाली

**दि.२७, नागपूर :** सुईचा टोचून घेण्याचा साधा विचार जरी मनात आला, तरी अनेकांच्या अंगावर काटा येतो. विशेषतः लहान मुलांना इंजेक्शनची भीती असतेच, पण काही प्रौढही सुईपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. याच पार्श्वभूमीवर नागपूर शहरात आरोग्य सेवेत एक मोठी क्रांती घडली आहे. आता सुईशिवाय इंजेक्शन देण्याची प्रणाली नागपुरात सुरू झाली असून, यामुळे उपचार अधिक सुलभ, वेदनारहित आणि सुरक्षित बनणार आहेत. सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांच्या पुढाकाराने हे सुई-मुक्त इंजेक्शन नागपुरात दाखल झाले आहे. डॉक्टर अविनाश गावंडे यांनी या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक करून दाखवले आहे.

**ना सुईची भीती, ना वेदना, ना सूज**

या नव्या पद्धतीत जेट इन्फ्युझन तंत्रज्ञान वापरले जाते. या तंत्राद्वारे औषध एका विशेष पिस्टल सदृश्य उपकरणाद्वारे त्वचेतून ४ सेंटीमीटर खोल मसल्समध्ये प्रवेश करते. इंजेक्शन देताना कोणतीही सुई वापरली जात नाही. उच्च दाबाचा वापर करून औषध त्वचेच्या आत सोडले जाते. त्यामुळे या पद्धतीत ना सुईची भीती, ना वेदना, ना सूज.आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे संसर्गाचा धोका अत्यंत कमी.

**तेलयुक्त औषधांसाठी ही पद्धत उपयुक्त नाही**

डॉ. गावंडे यांच्या म्हणण्यानुसार, सामान्य इंजेक्शनमध्ये कधी कधी नसांना इजा, टिश्यू डॅमेज, किंवा संसर्ग होण्याची शक्यता असते. परंतु सुईविना दिल्या जाणाऱ्या इंजेक्शनमध्ये हे धोके जवळजवळ नाहीसे होतात. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयोगटांमध्ये ही पद्धत फायदेशीर आहे. या पद्धतीद्वारे इंट्रामस्क्युलर आणि सबक्युटेनस प्रकारच्या इंजेक्शन्स दिले जातात. विशेषतः लसीकरण, इन्सुलिन इत्यादींच्या वापरात याचे महत्त्व वाढत आहे. मात्र, तेलयुक्त औषधांसाठी ही पद्धत उपयुक्त नाही, असेही डॉ. अविनाश गावंडे यांनी स्पष्ट केले. लहान मुलांपासून वयोवृद्ध व्यक्तींपर्यंत या तंत्रज्ञानाचे चाचणीआधारित प्रयोग झाले असून, याचे परिणाम समाधानकारक आहेत. यामुळे भविष्यात या पद्धतीचा वापर अधिक व्यापक प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. सुईची भीती दूर करत सुरक्षित आणि वेदनारहित उपचार देणारे हे तंत्रज्ञान नागपूरच्या आरोग्य क्षेत्रात एक नवीन वाट निर्माण करत आहे.

# इंग्लंडचे गर्वहरण करत भारताने गड राखला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मँचेस्टर :** भारतीय संघ चौथा सामना हरणार, अशी जोरदार चर्चा होती. इंग्लंडचा संघ यावेळी विजयाचे सेलिब्रेशन करण्यात गुंग होता. पण त्याचवेळी भारतीय संघाने इंग्लंडचे गर्वहरण केले आणि मँचेस्टरचा गड राखला. भारतावर यावेळी पराभवाची नामुष्की ओढवली होती. पण भारताने पाचव्या दिवशीही दिमाखदार खेळ केला आणि हा सामना ड्रॉ राखण्यात त्यांना यश आले. या सामन्यात गिलनंतर (१०३) रवींद्र जडेजा (नाबाद १०७) आणि वॉशिंग्टन सुंदर (नाबाद १००) यांनीही शतक झळकावत इंग्लंडला हतबल करून सोडले. भारताने ४ बाद ४२४ अशी धावसंख्या करत आपला डाव घोषित केला. इंग्लंडनेही यावेळी हार मानली.



इंग्लंडने या सामन्यात ६०० धावांचा पल्ला ओलांडला. भारतावरर ३११ धावांची आघाडीही घेतली होती. त्यानंतर इंग्लडने भारताने दोन फलंदाज शून्यावर बाद केले. त्यामुळे भारताचा चौथ्याच दिवशी पराभव होईल, असे म्हटले जात होते. पण त्यानंतर मैदानात शुभमन गिल आणि केएल राहुल समर्थपणे उभे राहीले. या दोघांनी चौथा दिवस खेळून काढला. पण त्यानंतरही पाचव्या दिवशी भारतीय संघावर पराभवाची टांगती तलवार होती. पण पाचव्या दिवशी भारतीय संघ फलंदाजीला उतरला आणि त्यावेळी एक वेगळीच गोष्ट पाहायला मिळाली.

पाचव्या दिवशी जेव्हा भारतीय संघ मैदानात उतरला. तेव्हा भारतीय खेळाडूंचाा आत्मविश्वास चांगलाच दुणावला होता. राहुल आणि गिल यांनी दमदार फलंदाजी केली. राहुल शतकासमीप आला होता.

पण राहुलला यावेळी शतक झळकावता आले नाही. राहुलने यावेळी ८ चौकारांच्या जोरावर ९० धावांची खेळी साकारली. राहुलला शतक झळकावता आले नसले तरी गिलने ही कसर भरून काढली. कारण गिलने यावेळी शतक झळकावत इतिहास रचला. गेल्या ३५ वर्षांत भारताचे या मैदानातील पहिले शतक ठरले. शतकानंतर गिलला जास्त फलंदाजी करता आली नाही. लंचला १० मिनिटे असताना तो बाद झाला. भारताला हा मोठा धक्का बसला होता, पण भारताला या गोष्टीची झळ जाणवली नाही.

गिल बाद झाला तरी वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनी इंग्लंडच्या गोलंदाजीची पिसे काढली. इंग्लंडचे गोलंदाज जडेजा आणि सुंदर यांच्यापुढे नतमस्तक झाल्याचे पाहायला मिळाले. पण जडेजा आणि सुंदर यांनी यावेळी दमदार फलंदाजी केली आणि भारताला सामना ड्रॉ राखण्यात सर्वात महत्वाची भूमिका या जोडीने बजावली.

## उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे ‘मातोश्री’वर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख Uddhav Thackeray यांचा आज वाढदिवस आहे.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षावर होत असताना एक नवी घडामोड समोर आली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या मातोश्री या निवासस्थानी गेले आहेत. Raj Thackeray हे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर अनेक वर्षांनी आज मातोश्री या निवासस्थानी दाखल झाल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या.

मराठी विजय मिळाव्याच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी राज आणि उद्धव ठाकरे हे तब्बल १९ वर्षांनंतर एका व्यासपीठावर आले होते. त्यानंतर आता वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर गेल्याने ठाकरे बंधूंच्या मनोमिनलाची प्रक्रिया आणखी पुढे सरकल्याचं दिसत आहे. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या हे दोन्ही भाऊ एकत्र येतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. अशातच उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने बंधू राज ठाकरे माताश्रीवर गेल्याने या चर्चांना आणखीनच बळ मिळालं आहे.

**जिव्हाळा, संघर्ष अन् मनोमिलनाची प्रक्रिया**

राज ठाकरे यांचं लहानपण मातोश्री निवासस्थानी गेलं. ते मातोश्रीवर असताना त्यांना त्यांचे काका शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा प्रचंड जिव्हाळा आणि प्रेम अनुभवयास मिळाले.



मात्र नंतर उद्धव ठाकरे यांच्याशी झालेल्या मतभेदानंतर राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडले आणि त्यांनी मातोश्री निवासस्थानही सोडलं. त्यानंतर त्यांचा उद्धव ठाकरेंशी कायमच राजकीय संघर्ष होत राहिला. मात्र आता राज्यातील बदलेल्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा दोन्ही बंधूंच्या राजकीय मनोमिलनाची प्रक्रिया सुरू झाली असून आधी मराठी विजय मेळावा आणि आता उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे दोन्ही बंधू एकत्र आले आहेत.

दरम्यान, Raj Uddhav Reunion चे रुपांतर आगामी काळात राजकीय युतीत होणार का आणि आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे एकत्रित निवडणुका लढणार का, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.


## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मागणीला यश: प्रशासनाने २४ तासाच्या आत घेतली दखल

### भुयारी मार्ग प्रकाशमय होऊन झगमगला !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, तलोजा (नवी मुंबई) :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तक्रार दाखल होताच २४ तासाच्या आत मध्ये भुयारी मार्ग प्रकाश मय होऊन झगमगला, तलोजा भुयारी मार्गातील (सबवे) मधील प्रकाश लाईट अनेक दिवस बंद होत्या तक्रार दाखल करताच २४ तासाच्या आत मध्येच ’तलोजा भुयारी मार्ग प्रकाश मय होऊन झगमगला.

तलोजा फेज वन येतील अंडरपास मध्ये नागरिकांना जाण्या येण्याकरिता लहान अंडरपास बनवण्यात आलेला आहे सदर अंडरपास मध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाणी भरलेले असते त्याचबरोबर रात्रीच्या वेळी आत मधील लाईट्स नेहमीच बंद असल्याच्या तक्रारी नागरिकांनी पांचनद नगर रहिवासी सामाजिक संस्था तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अनेक तक्रारी दाखल केला होत्या. नागरिकांना, शालेय विद्यार्थी, सीनियर सिटीजन, तसेच महिला वर्गास रात्रीच्या वेळी किंवा दिवसाही पायी जात असताना पाणी भरल्याने तसेच लाईट बंद असल्यामुळे आपला जीव धोक्यात घालून नाविलाजास्तव रेल्वे ट्रॅक ओलांडावा लागत होता याबाबत रेल्वे विभागाचे इंजिनियर, अजित सिंग , तसेच इलेक्ट्रिक डिपार्टमेंट श्री राजेश पाटील साहेबांच्या सदर बाब निदर्शनास आणून दिल्या. रात्रीच्या वेळेस नव्याने आलेल्या प्रवासी किंवा महिलावर्ग या सववेमधून जात असताना त्या ठिकाणी गर्दुल्ले त्यांच्याकडून अंधाराचा फायदा घेऊन लूटमार करण्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत.





भविष्य काळामध्ये सदर ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता लाईटची व्यवस्था तसेच, सी सी कॅमेरे बसवणे वेळोवेळी पाण्याचा निचरा करून साफसफाई करणे रात्रीच्या वेळी स्थानिक पोलीस प्रशासन तसेच रेल्वे पोलीस यांच्या वतीने नाईट राउंड मारणे इत्यादी बाबत आदरणीय महोदयांनी गांभीर्यपूर्वक पाहणी दौरा करून संबंधित विभागास योग्य ते निर्देश देऊन नागरिकांना येण्या जाण्याकरिता सबवे सुस्थितीमध्ये चालू करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस कामसभाई मुलाणी यांनी केली होती. प्रशासनाने २४ तासाच्या आत त्याची दखल घेतली आहे. तलोजा फेज वन येथे नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. प्रशासनाने दखल घेतल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तसेच राष्ट्रवादीचे कासम मुलाणी यांचे सुद्धा आभार मानले आहेत.




## आता थायलंड - कंबोडिया यांच्यात लष्करी संघर्ष !

संपूर्ण जग सध्या युद्धाच्या खाईत लोटले आहे. आशिया, युरोप, अमेरिका सर्वच खंडात कोणत्या ना कोणत्या देशात युद्ध चालू आहे. रशिया युक्रेन युद्ध दोन वर्ष झाली तरी चालूच आहे. इस्त्राईल हा देश तर सतत वार मोडवर असतो. कधी पॅलेस्टाईन कधी कधी हमास, कधी जॉर्डन तर कधी इराण या देशांशी इस्त्राईलचे युद्ध सुरुच असते. मागील वर्षी अझरबैजान आणि अल्बेनिया या देशात युद्ध झाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाचा भडका उडाला होता. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले ऑपरेशन सिंदूरने तर संपूर्ण जगाची चिंता वाढवली होती. भारत आणि चीन यांच्यात १९६२ पासून तणाव आहे. चीन आणि तैवान यांच्यातही कायम तणाव असतो या दोन्ही देशात कधीही युद्धाला तोंड फुटेल अशी शक्यता असते. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांच्यातही तीच परिस्थिती असते आता त्यात आणखी एका युद्धाची भर पडली आहे देशांशी हे युद्धही आशिया खंडातील दोन देशातच सुरू झाले आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही देश भारताचे सख्खे शेजारी नसले तरी शेजारी आहेत. भारताचा शेजारी असलेल्या म्यानमार या देशाच्या पलिकडे हे देश आहेत. आशिया खंडातील महत्वाचे असणाऱ्या कंबोडिया आणि थायलंड या देशात सध्या मोठा लष्करी संघर्ष सुरू आहे. या दोन्ही देशातील तणाव शिगेला पोहचला असून दोन्ही देशातील सैन्यामध्ये सीमेवर तुफान गोळीबार चालू असून त्यात आतापर्यंत दोन्ही बाजूंनी ३३ सैनिकांचा बळी गेला असून शेकडो सैनिक जखमी झाले आहेत. सोमवारी या संघर्षास सुरुवात झाली पहिल्याच दिवशी दोन्ही बाजूंचे ११ नागरिक गोळीबारात मारले गेले. थायलंडने गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप कंबोडियाने केला तर कंबोडियाने प्रथम गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप थायलंडने केला आहे. दोन्ही देश एकमेकांवर आरोप करीत असले तरी दोन्ही देश या युद्धास पूर्वी पासून सज्ज होते फक्त त्यांना युद्धास निमित्त हवे होते ते निमित्त त्यांना सोमवारी मिळाले. सोमवारी सीमेवर गोळीबार झाला आणि युद्धाला तोंड फुटले. मिळालेल्या माहितीनुसार रॉयल कंबोडियन आर्मीने सीमेवर ड्रोन तैनात केले होते. त्यांनी तोफ आणि लांब पल्ल्याच्या बीएम - २१ रॉकेटने गोळीबार केला त्याला थायलंडने चोख प्रतिउत्तर दिले. गोळीबाराने सुरू झालेला हा संघर्ष आता उग्र स्वरूप धारण करत आहे. या युद्धात ड्रोन, रॉकेट, फायटर विमान, तोफा यांचा वापर होत आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या लष्करी तळावर हल्ला केला जात आहे. हा लष्करी संघर्ष लवकरात लवकर संपावा अशी जगाची इच्छा आहे. भारतानेही तसे बोलून दाखवले आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशात प्रवास करण्याचे टाळावे असे आव्हान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने केले आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे या युद्धात नाक खुपसले आहे. स्वतःला आंतरराष्ट्रीय तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष म्हणवून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी लवकरात लवकर हा संघर्ष थांबवावा नाही तर अमेरिका या दोन्ही देशांशी होणारा व्यापार थांबवेल असा दम दिला आहे. मात्र सद्यस्थितीत दोन्ही देश ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. दोन्ही देश एकमेकांवर हल्ला करतच आहेत त्यामुळे हा संघर्ष आणखी वाढेल अशीच शक्यता आहे.

**थायलंड आणि कंबोडिया या दोन्ही देशातील वाद हा आताच नाही अनेक दशकांपासून सुरू आहे. प्रिह विहार नावाचे एक मंदिर या दोन्ही देशांच्या सीमेवर आहे. या मंदिराच्या मालकी मालकी हक्कावरून दोन्ही देशांमध्ये तीव्र मतभेद आहेत. हे मंदिर आपल्याच प्रदेशात आहे असा दावा दोन्ही देशांचा आहे त्यावरून २००८ आणि २०११ साली या दोन्ही देशात असाच संघर्ष झाला होता. आता पुन्हा त्याच कारणाने या दोन्ही देशात संघर्ष सुरू आहे. या वर्षीच्या मे महिन्यात एका कंबोडियन सैनिकाला गोळ्या घालून ठार करण्यात आले होते तेंव्हा देखील असाच मोठा तणाव निर्माण झाला होता. तेंव्हा या दोन्ही देशात युद्ध पेटेल अशी शक्यता जाणकारांनी वर्तवली होती. सुदैवाने तेंव्हा तो संघर्ष टळला आता मात्र हा संघर्ष टळू शकला नाही आणि अखेर युद्धाला तोंड फुटले.**

# जय जय महाराष्ट्र माझा...!

महाराष्ट्र ही संतांची, छत्रपती शिवरायांची, जिजाबाई, अहिल्याबाई, सावित्रीबाई,ताराबाई, यांची तसे महान सुधारकांची परंपरा असलेली पवित्र भूमी आहे. इथे कला संस्कृती साहित्य याचा गौरव होतो. मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय आमचा एक महाराष्ट्र देश हा.असे आपण अभिमानाने म्हणतो. जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा म्हणून महाराष्ट्राचा जयजयकार करतो.पण...

गेल्या काही वर्षात या महाराष्ट्रात राजकिय आणि सामाजिक क्षेत्रात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली आहे.राजकीय समीकरणे पार बदलून गेली. सत्तेच्या राजकारणामुळे तत्व धुळीला मिळाले आहेत. काल काय बोललो होतो आणि आज काय करत आहोत याचे भान नष्ट होत चालले आहे.बोलण्यात, कृतीत ताळमेळ नाही.बेताल आणि पातळी सोडून वागणे, बोलणे होत आहे. मग प्रश्न पडतो की आपण वर्णन करतो यातला महाराष्ट्र हरवत चालला आहे काय. ?

गेल्या वर्षीचे मनोज जरांगे पाटलांचे आरक्षण आंदोलनाने सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. महाराष्ट्रभर त्याचे पडसाद उमटले संपत्तीचे नुकसान. झाले.अनेकांबद्दल पातळी सोडून बोलले गेले. त्यानंतर बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांचे निर्घृण हत्या प्रकरण. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता आणि संताप व्यक्त केला गेला. हळहळ व्यक्त झाली. हे प्रकरण मागे पडत नाही तो पुण्यामध्ये वैशाली हगवणे हत्या आत्महत्या प्रकरण उघडकीला आले. ह्या प्रकारांवर फार मोठ्या प्रमाणावर समाजातून माध्यमातून चर्चा झाली आणि त्यातूनही परत अनेक गोष्टी समोर आल्या या प्रकरणांमध्ये राजकीय पाठबळ असल्याचेही बराच वेळा दाखवून दिले गेले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड आणि त्यासोबतच राजकीय वरदहस्त म्हणून धनंजय मुंडे यांचे नाव पुढे आले. त्यांना काही काळाने का होईना त्यांचे पदाचा राजीनामा द्यावा लागला. आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरले. त्यातून ते कृषिमंत्री असताना फायदा घेऊन धनंजय मुंडे यांनी वेळोवेळी कसा भ्रष्टाचार केला हेही समोर आले.तर वर्तमानपत्रातून तो जनतेसमोर आणला गेला. धनंजय मुंडे कृषी मंत्री असताना अगदी बदली करायचे रेट कसे कसे होते वर्तमान पत्रात चार्टसहित प्रसिद्ध झाले आहे.ही बाब तर दुर्लक्षितच राहिली. त्याच्यावर मात्र काही चर्चा नाही. तरीही आता ते म्हणत आहेत माझ्या बीडच्या मातीला बदनाम करू नका.

निवडणुकीच्या आधी आश्वासन देणे हे तर राजकिय नेत्यांची कामच आहे. ज्याप्रमाणे आताही



शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी किंवा सातबारा उतारा कोरा करणे, विमा रकमा ताबडतोब मिळाल्याविषयी आश्वासन झाले, लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये, शेतकऱ्यांना मानधन योजना, हे सर्व जर बघितले तर आता काही काळ लोटल्यानंतर ह्या आश्वासनाची किती पूर्तता झाली याविषयी लोकांमध्ये आता चुळबूळ सुरू झाली आहे. निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणींना सरसकट कुठलेही निकष न लावता येतील ते अर्ज मंजूर करून दिले गेले. परंतु

**दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा-८९९९५६६९१७**

आता त्याची मात्र छाननी सुरू झाली आणि आता त्यात सुधारणा करण्यात आली.वेगवेगळे निकष लावले जात आहे. कर्जमाफीचेही तसेच झाले. त्यासाठी पुन्हा एकदा महाराष्ट्र ढवळून निघाला. बच्चू कडूंचे आंदोलन सुरू झाले आणि आता माफी घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असा त्यांनी चंगच बांधला. आता अधिवेशनात कर्जमाफी विषयी परत एकदा नवीन निकष लावून त्याचा निर्णय होईल, त्यालाही आता बराच कालावधी लागणार आहे. त्याच्याविषयी अजून स्पष्टपणे धोरण जाहीर होईल तेव्हा समजेल. फक्त गरीब शेतकऱ्यांनाच शेती कर्जमाफीचा फायदा मिळावा म्हणून काही निकष लावून माफी दिली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पण ज्यांनी कर्जफेड वेळेवर केली आहे त्यांना काय प्रोत्साहन दिल्या जाणार त्या बाबतीत कुठलाही निर्णय जाहीर झाला नाही.आम्ही वेळेवर पैसे भरतोही चूक करतो का ? असाही प्रश्न विचारला जातोय.

नुकतेच अधिवेशन पार पडले अधिवेशनामध्ये जनतेच्या असंख्य प्रकारच्या विषयी चर्चा होणे आवश्यक असते. परंतु अधिवेशन काळात अनेक गोष्टी अशा घडतात की महत्त्वाचे मुद्दे बाजूला राहतात आणि नाही त्या गोष्टीवर फोकस केला जातो अधिवेशन काळातही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे मोबाईलवर रमी खेळण्याविषयीचे वृत्त आणि व्हिडिओ प्रसिद्ध झाला. त्यामुळे परत एकदा हे अधिवेशनात आपले आमदार आणि मंत्री किती गंभीरपणे बघतात हे एकदा समोर आले. जनतेच्या प्रश्नाकडे किती गंभीरपणे ते चर्चेत ते सहभागी होता हे दिसून आले त्याच काळात गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड या दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनात तुंबळ झाले. चित्रपट स्टाईल हाणामारी झाली. वास्तविक पाहता अधिवेशन काळात अशावेळी बाहेरच्या व्यक्तीला प्रवेश नको असे असताना सुद्धा बाहेरची व्यक्ती आत मध्ये प्रवेश करतात आणि ही परिस्थिती उद्भवते ही अतिशय गंभीर बाब आहे. पक्ष कोणताही असो परंतु त्यासाठी नियमावली ही एकच पाहिजे अधिवेशन काळात कृषिमंत्री मोबाईल बघत होते. त्या संदर्भात परत एकदा लातूरमध्ये कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. लातूरमध्ये सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद सुरू असताना छावा संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी कृषी मंत्राच्या राजीनाम्याचे निवेदन देण्याविषयीचे गोष्टीमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि छावा संघटना यातही हाणामारी झाली. अनिल परब यांनी मंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने बार असल्याचे उघड केले.हनीट्रॅप प्रकरण गाजते आहे. म्हणजे महत्त्वाचे प्रश्न बाजूला राहतात आणि राजकीय नेत्यांच्या मंत्र्यांच्या या प्रकरणांमध्ये जास्त लक्ष घालावे लागते.अधिवेशनाचा अधिक वेळ खर्च होतो. अर्थात राजकीय नेते बराच वेळा कार्यकर्त्यांना अभय देत असल्यामुळे अशा गोष्टी घडतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अधिवेशनात चर्चा बरोबरच पोलखोल प्रकरणे वाढत असल्याचे दिसून येत आहे.

निवडणूक आयोगाचे आकडेवारी नुसार विधानसभेत २८६ आमदारापैकी ११८ आमदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले दाखल आहेत. राजकारणात गुन्हेगारी करण गंभीर बाब आहे.

राज्यात एकूण १०८००० जिल्हा परिषद मराठी शाळा असून अनेक शाळांमध्ये पटसंख्या ही २० पेक्षाही कमी आहे अशा अठरा हजार मराठी शाळा विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे बंद होणार असलेली माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. एकीकडे आपण मराठी शाळा विषयी मराठी भाषेविषयी आग्रही असताना या शाळा बंद होणे तितकेच धोक्याचे आहे.त्याशाळा बंद होवू नये यासाठी प्रयत्न हवे. अशा परिस्थितीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा कल वाढणार नाही तर नवलच. अशा शाळांमध्ये लाखाने फी आणि डोनेशन घेतले जाते. त्याविषयी पालकांमध्ये असंतोष आहे.त्या शाळांवर काहीच बंधन नाही का ? अशा खाजगी शाळावर काही बंधन, निमम घालणार का नाही.? काही शिक्षण संस्थांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या संख्येत तफावत आढळली तर संस्थेने आपल्या बांधकामामध्ये कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडवल्याचे उघड झाले आहे.बनावट कागदपत्रे, प्रवेश,शिक्के बनवून कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली, त्याचेही चौकशी मागणी अधिवेशनात केली आहे.

स्त्रियांवरील अत्याचार हा तर नेहमीचाच विषय आहे. स्त्रिया- मुली गायब होणे तसेच जबरदस्तीतून धर्मांतर करायला लावायचे घटना समोर येत आहे. याच्यावरही काहीतरी ठोस उपाय करणे आवश्यक असताना तिकडेही दुर्लक्ष होत आहे. शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये कॅमेरा लावून त्याचे चित्रिकरण करायची घटना बाहेरली घडल्या होत्या तर नुकतेच एका शाळेमध्ये मुलींच्या मासिक पाळीच्या विषयावरून मुलींना विवस्त्र करून पाळीची तपासणी केली. अशा अप्रिय घटना असंतोषाला कारणीभूत ठरणाऱ्या घटना घडत आहेत.महिला आयोगाने ही ह्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

त्रिभाषा वाद अजून मिटला नाही.त्यासाठी वेळोवेळी आंदोलनाचा पवित्रा घेतला जात आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करता,

अधिवेशन काळात विधिमंडळ सभागृहात प्रवेशासाठी कडक धोरण अवलंबिले जावे.

अधिवेशनात असंस्कृत, असंसदीय शब्दांचा वापर होवू नये. पातळी सोडून बोलू नये.

केवळ आरोपप्रत्यारोपात अधिवेशनाचा वेळ वाया घालवू नये.जनतेच्या प्रश्नावर, शेतकरी समस्या, बेरोजगारी, सरकारी योजनावर चर्चा होणे अपेक्षित आहे.

मोबाईल रमी प्रकरण चर्चा बघता अधिवेशन काळात सभागृहात मोबाईल वापरायला बंदी घालावी.आपण जनतेच्या भल्यासाठी ईथे आलेलो आहोत, याच भान ठेवायला हवे.

कारण या अधिवेशनावर शासनाचा,अर्थात जनतेचाच कोट्यावधी चा निधी, पैसा खर्च होत असतो. त्यातून काही निष्पन्न व्हायला हवे.

जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणत आहे की,एकूणच घडणाऱ्या घटनावरुन,वागणूकीतून आमदारांना माज आलाय ही भावना कुठतरी जनतेमध्ये निर्माण होत आहे का.? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करुन सर्वांनाच वागणूक व्यवस्थित ठेवण्यासाठी जाणिव करून दिली हे तितकेच महत्त्वाचे आहे.

अधिवेशनात पातळी सोडून बोलण,वागणे, आरोपप्रत्यारोप,प्रकरणांमधली पोलखोल हेच बघायला मिळते.

कुठेतरी ह्याचा विचार करायची वेळ आली आहे. त्यावर चिंतन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या महान परंपरेची आब राखा म्हणायची वेळ आली आहे.

## निवृत्त...

अधिकार गाजवणे
सवय अंगात न्यारी
माणसा पेक्षा खुर्ची
रे सत्तास्थाने प्यारी

दुखवले कैक जणां
बोलणे कटुविखारी
कडू तिखट वैखरी
वृत्ती बनली विषारी

शिस्तीचेनावाखाली
सदैव दुजा धुत्कारी
दिमतीले नीत हजर
रे मालमत्तासरकारी

निवृत्त होती जेधवा
मदोन्मत्तअधिकारी
मनोमनआनंदोत्सव
साजरे करे सहकारी

ब्याद टळली एकदा
होतीसकल आभारी
प्रतिक्षा नव्यासराची
भला नेमावा प्रभारी

कोरडेआगतस्वागत
तो मान ना घरीदारी
सुटला बिचारा हत्ती
सोडूननिघताअंबारी

**- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.**

# उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन व्यवस्थितच व्हायला हवे !




सार्वजनिक गणेशमूर्ती विसर्जनाबाबत अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला निर्णय उच्च न्यायालयाने अखेर दिला आहे. नवीन निर्णयानुसार ६ फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे बंधनकारक असणार आहे, तर ६ फुटांपेक्षा अधिक उंची असलेल्या गणेशमूर्त्या समुद्र आणि नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वांत मोठा उत्सव. गणेशोत्सव काळात गिरगाव, लालबाग आणि परळ या भागांत रात्रीचा दिवस झालेला असतो.

सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आणि गणेशभक्तांची वर्दळ या दहा दिवसांत दिसून येते. भक्ती आणि जल्लोष यांचा संगम असलेला हा उत्सव पाहण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी आणि मनात त्याच्या आठवणी कायमच्या कोरण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक या दिवसांत मुंबईत दाखल होतात. गणेशभक्तांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतील अनेक मंडळांत उंच गणेशमूर्ती आणण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काही मंडळे सजावटीवर अधिक खर्च न करता मंडळात केवळ उंच मूर्ती बसवण्यावर भर देतात.

मुंबईतील हा उत्साह पाहून गेल्या काही वर्षांपासून समुद्र किनारा लाभलेल्या मुंबई बाहेरील जिल्ह्यातही उंच मुर्त्या बसवण्यात येऊ लागल्या आहेत. गणेशमुर्त्यांच्या उंचीबाबत बाजूबाजूच्या मंडळांमध्ये दरवर्षी स्पर्धा रंगलेली पाहायला मिळते. वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या यांमध्ये या उंच मुर्त्यांची छायाचित्रे झळकत असल्याने त्या जवळून पाहण्यासाठी गणेशभक्त मित्रमंडळी आणि नातेवाईकांसह दिवस-दिवसभर रांगेत उभे राहतात. १० दिवस मंडपात राजासमान विराजमान झालेल्या श्री गणेशमूर्ती विसर्जनाचा दिवस जेव्हा येतो तेव्हा तिला समुद्रापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. रस्त्यातील अडथळे आणि गर्दीतून वाट काढत श्रींची मूर्ती समुद्रापर्यंत आणताना त्यांची चांगलीच दमछाक होते.

उंच गणेशमूर्त्या खरेतर खोल समुद्रात विसर्जित करणे अपेक्षित असते; मात्र अनेक मंडळे विसर्जनाच्या वेळी मुर्त्या अर्ध्या पाण्यात अक्षरशः ढकलून पाडतात. त्या बुडण्यासाठी कार्यकर्ते मुर्त्यांवर उभे राहतात. त्यांचे पूर्णपणे विसर्जन झाले कि नाही याकडे मागे वळून न पाहता तिथून पळ काढतात. तर काही मंडळे उंच मुर्त्या तशाच अर्धवट पाण्यात सोडून निघून जातात. ओहोटीच्या वेळी पाणी किनाऱ्यापासून दूर गेल्यावर या मुर्त्या समुद्र किनाऱ्यावर तशाच उभ्या असलेल्या दिसून येतात. अनेक मुर्त्यांचे भग्न अवशेष किनाऱ्यावर आलेले पाहायला मिळतात.

ज्या गणेशमूर्तींमध्ये प्रत्यक्ष श्रीगणेश विराजमान आहेत या भावाने आपण १० दिवस तिची मनोभावे पूजा करतो, त्या मूर्तींची विसर्जनाच्या वेळेस होणारी अवहेलना कोणत्याही गणेशभक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारी असते. लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजा गणेशोत्सव मंडळातील श्रींच्या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी तराफांच्या साहाय्याने खोल समुद्रात केले जाते. तो दिव्य सोहळा पाहताना आणि बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांचे पारणे फिटते. जर लालबागच्या राजा मंडळाच्या उंच मूर्तीचे विसर्जन खोल समुद्रात केले जाऊ शकते तर इतरांना ते का शक्य नाही. आणि ज्यांना उंच गणेशमूर्त्यांचे विसर्जन विधिवत आणि भावपूर्ण करता येत नसेल अशा मुर्त्यांनी उंच गणेशमूर्त्या बसवून श्रीगणेशाची अवहेलना तरी करू नये. श्रीगणेशमूर्ती ही सजावटीची किंवा देखाव्याची वस्तू नव्हे, जी दहा दिवस सजवून मंडपात बसवली आणि अनंत चतुर्दशीला समुद्रावर सोडून दिली. गणेश भक्तांच्या श्रद्धेमुळे गणेशोत्सवादरम्यान गणेशमुर्तींमध्ये श्री गणेशाचे तत्व मोठ्या प्रमाणात अवतरित झालेले असते त्यामुळे त्या मूर्तींचा योग्य तो आदर-सन्मान राखला जायला हवा. तिचे विसर्जन शास्त्रशुद्धच व्हायला हवे अन्यथा श्री गणेशाच्या कृपेपेक्षा अवकृपेसच आपण पात्र होऊ.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९९६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## सुपा येथे समता परिषदेच्यावतीने उपमुख्यमंत्री पवार यांचे जल्लोषात स्वागत



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** रविवार, दिनांक २७ जुलै २०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यांचे सुपा येथे आगमन होताच समता परिषदेच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमास परिसरातील शेकडो कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. यावेळी आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, मार्केट कमिटी चेअरमन प्रशांतराव गायकवाड, माजी जि.प.सदस्य वसंतराव चेडे, नगराध्यक्ष विजय औटी, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, चेअरमन दत्ताशेठ पवार, अमोल मैड, चंदन लोंढे, ऋषिकेश लोंढे, महिला कार्याध्यक्षा सुधामती कवाद, महिला तालुकाध्यक्ष सुषमाताई रावडे, युवती अध्यक्षा अपर्णा खामकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करून दादांचे स्वागत केले आणि संपूर्ण सुपा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## भाजपा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्षपदी गुलाब सुर्यवंशी यांची दुसऱ्यांदा निवड



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२७, मुदखेड (नांदेड) :** भाजपा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्षपदी गुलाब सुर्यवंशी मा.सरपंच विद्यमान उपसरपंच प्रतिनीधी पिंपळकौठा (चोर) यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण भोकर मतदार संघाच्या लाडक्या आमदार अँड श्रीजयाताई चव्हाण नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोरभाऊ देशमुख यांच्या सुचनेनुसार तालुकाध्यक्ष दत्तु देशमुख व शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी नुकतीच मुदखेड तालुका कार्यकारिणी जाहीर केली आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गोविंदराव पाटील नागेलीकर, महामंत्री प्रविण गायकवाड, बाळासाहेब देशमुख बारडकर, निलेश देशमुख बारडकर, शंकर मुतकलवाड, गणेशराव पाटील शिंदे, मारोती पाटील शंखतीर्थकर, डॉ.माणिकराव जाधव, सुदाम पाटील खानसोळे, भिमराव पाटील कल्याणे, संतोष पाटील गाढे, संजय सोनटक्के, विलास पाटील कल्याणे, संजय आऊलवार, श्रीहारी बैनवाड, बळी पाटील ढगे, भगवान पाटील पानेवार, शंकरराव पाटील पवार, दिगांबर टिप्परसे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल, अनुसूचित जाती मोर्चा तालुकाध्यक्ष संजय कोलते आदी पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## ग्रीन झोन तालुक्यात बेसुमार वाळू उपसा; विभागीय आयुक्ताकडे तक्रार

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२७, मुदखेड (नांदेड) :** तालुका राष्ट्रीय हरीत लवाद ग्रीन झोन घोषित करण्यात आला असतांनाही वाळू माफिया राजकीय दबावाचा वापर करून वाळू घाटातून बेसुमार वाळू उपसा केला जात असून शासकीय गौणखनिज मालमत्तेवर डल्ला मारला जात आहे. ग्रीन झोन पट्ट्यातील बेकायदेशीर उपसा विरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुकेश कांबळे यांनी थेट विभागीय आयुक्ताकडे तक्रार केली आहे. मुदखेड तालुक्यात महसूल प्रशासनाने अनेक वेळा धाडसी कार्यवाही करून उपसा करणाऱ्या बोटा उध्वस्त केल्या होत्या. यासाठी विशेष पथकाच्या माध्यमातून करडी नजर ठेवली जात होती. परंतु वाळू तस्करांना राजकीय अभय असल्याने खुसकीच्या मार्गाचा अवलंब करून हायवेच्या ताफ्यात शस्त्रांचा धाक दाखवत वाळू तस्करी केली जाते. यापूर्वी विभागीय महसूल अधिकाऱ्यांवर प्राण घातक हल्ला ही करण्यात आला होता. तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी कारवाईचा भडगाव उगारल्याने बदलीसाठी राजकीय उंबरठे झिजवत जात आहे. तहसीलच्या महसूल पथकाने मुगट परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर क्रमांक एम.एच ४६ ए.एफ ७८६९ यावर कार्यवाही केली आहे. ३१ हजारांचा दंड आकारला असुन दीड ब्रास वाळू टिप्पर सहित जप्त करण्यात आली आहे. तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या पथकातील तलाठी मनोज वाघमारे, राजकुमार मस्के, गंगाधर मोरे ,गोपाळ माने यांनी कारवाई केली आहे. मुदखेड तालुका राष्ट्रीय हवीत लवाद ग्रीन झोन घोषित केल्याने शासकीय गौणखनिज उत्खननावर बंदी आहे. परंतु तालुक्यातील अनेक गावांत बेसुमार अवैध वाळू उपसा सुरूच आहे. या विरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मनोज कांबळे यांनी थेट विभागीय आयुक्ताकडे तक्रार केली आहे. वाळू तस्करांवर कोणती कार्यवाही केली जाणार हेच पहावे लागणार. महसूल मंत्री बावनकुळे यांनी विधानसभेत वाळू तस्करांना रोखण्यासाठी महसूल प्रशासनासोबत पोलीस कार्यवाही करण्याचा कायदा पास केला आहे. यामुळे ग्रीन झोन पट्ट्यातील वाळू उपशावर शासन काय कार्यवाही करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'मिशन बाल भरारी' चे उदघाटन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७ :** नागपूर येथे महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांच्या 'मिशन बाल भरारी' या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री अँड.आशिष जयस्वाल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. बालवाडीच्या माध्यमातून लहानपणीच बालमनावर एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी, महानगरातील मुलांना ज्या सेवासुविधांच्या माध्यमातून घरच्याघरीच जो विश्वास मिळतो तो विश्वास ग्रामीण भागातील अंगणवाड्यांमध्ये शिकणाऱ्या मुलांना ही मिळावा यादृष्टीने 'मिशन बाल भरारी' उपक्रमाचा उद्देश आहे.

## जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा सेमी इंग्लिश करण्यावर भर - ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गोरे



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, सातारा :** जिल्हा परिषदेचे शाळांमधील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण मिळावे. यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांना सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर या सर्व शाळा सेमी इंग्लिश करण्यावर भर राहणार आहे, अशी ग्वाही ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

खटाव तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा शिरसवडी येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या ७ वर्ग खोल्यांचे व पळशी येथील जिल्हा परिषद आदर्श शाळा येथील ९ खोल्यांचे भूमिपूजन मंत्री श्री. गोरे यांच्या हस्ते झाले. या भूमिपूजन प्रसंगी माजी आमदार डॉ.दिलीप येळगावकर, गटविकास अधिकारी योगेश कदम, अंकुश गोरे, गट शिक्षणाधिकारी सोनाली विभुते, अनिल माने, भरत जाधव, बंडा गोडसे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

शिरसवडी व पळशी येथील शाळेच्या नवीन खोल्यांचे बांधकाम चांगल्या पद्धतीने व वेळेवर करावे, असे सांगून मंत्री श्री. गोरे म्हणाले, जिल्हा परिषदेत शाळेतील शिक्षकांनी शाळेतील पटसंख्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. शाळांना सर्व सुविधा शासनामार्फत दिल्या जातील. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले शिक्षण दिले जाते याबाबत नागरिकांचा विश्वास संपादन करावा. खाजगी शाळांच्या स्पर्धेत कुठेही मागे राहू नये यासाठी सर्व शाळा आदर्श शाळा करण्यावर भर राहणार असल्याचे ही त्यांनी सांगितले. माण तालुक्यातील रस्ते, वीज, पाणी, शिक्षण या बाबींवर भर देण्यात आला असून विकास कामांसाठी कुठेही निधी कमी पडू दिला जाणार नाही. गावकऱ्यांनी शाळेच्या कामकाजात योगदान दिले त्या शाळा आदर्श शाळा झाल्या आहेत व या शाळेमध्ये पटसंख्या ही वाढली आहे. हे अनेक शाळांनी दाखवून दिले आहे.

शिरसवडी व पळशी येथील ग्रामस्थांनी शाळेमध्ये योगदान देऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण कसे शिक्षण मिळेल हे पाहण्याबरोबरच शाळेला विविध माध्यमातून मदत करावी, असे असेही मंत्री श्री. गोरे यांनी सांगून विविध संस्थांमध्ये उच्च पदावर जिल्हा परिषदेतील शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यरत आहे. नागरिकांनी ही आपल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश जिल्हा शाळेच्या शाळांमध्ये घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले.

## तुंगत सोसायटी निवडणुकीत जनशक्तीचा विजय

### माजी सरपंच आगतराव रणदिवे यांचे नेतृत्वावर शिक्कामोर्तब



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील तुंगत येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत अखेर सभासद शेतकऱ्यांनी गावचे माजी सरपंच आगतराव (मास्तर) रणदिवे यांचे नेतृत्वावर विश्वास दाखवित त्यांचे श्री तुंगेश्वर शेतकरी विकास पॅनलचे सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून दिल्याने हा जनशक्तीचा विजय असल्याची प्रतिक्रिया रणदिवे यांनी दिली.ग्राम पातळीवर अतिशय प्रतिष्ठेची करण्यात आलेल्या तुंगत विविध कार्यकारी सोसायटीवर मागील १५ वर्षांपासून माजी आमदार प्रशांत परिचारक गटाची एक हाती सत्ता आहे.

नुकतेच या सोसायटीच्या सन २०२५-३० करीता निवडणूक लागली होती. रविवार २७ जुलै रोजी हि निवडणुकीत प्रक्रीया पार पडून त्याच दिवशी मतमोजणी घेण्यात आली. सोसायटीवर सत्ताधारी परिचारक गटासमोर स्थानिक सर्व गटातील नेतेमंडळींनी एकत्रित येत आव्हान उभे केले असले तरी जनशक्तीने परिचारक गटाचे माजी सरपंच आगतराव मास्तर रणदिवे यांचे नेतृत्वात निवडणुकीत उतरलेल्या सर्व १३ उमेदवारांचे बाजुने कौल दिला असल्याचे स्पष्ट झाले आहे. सोसायटी निवडणुकीत मतदान प्रक्रीया रविवार ४ वाजेपर्यंत येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये पार पडली यानंतर लगेचच मतमोजणी घेण्यात आली.

यामध्ये रणदिवे यांचे नेतृत्वातील श्री तुंगेश्वर शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार विजयी झाले आहेत. निवडणुक निकालानंतर परिचारक समर्थकांनी जल्लोष करीत विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

या निवडणुकीत रणदिवे खंडेराव उत्तमराव, रणदिवे महादेव ब्रम्हदेव, रणदिवे महादेव देवचंद, रणदिवे गणपत वसंत, पवार नारायण अंकुश, आंध बाळू दत्तु, आंध आनंद भारत, नागणे शिवाजी विठ्ठल, रणदिवे ऐश्वर्या पद्मसिंह, कदम सुनंदा लक्ष्मण, मूलाणी शब्बीर अब्दुल, कोळेकर बाबासो सोमा, वनसाळे संतोष जनार्दन हे उमेदवार विजयी झाल आहेत.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे गटाचे ताब्यात असलेल्या तुंगत येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीत सत्तांतर करण्यासाठी गावातील ईतर सर्व गटाने एकत्रित मोट बांधली होती. ग्रामपंचायत निवडणुकीतील फॉर्म्युला सोसायटी निवडणुकीत चालणार की परिचारक गट आपले वर्चस्व अबाधित ठेवणार याबाबत चर्चा रंगत असतानाच पुन्हा एकदा सभासदांनी आगतराव (मास्तर) रणदिवे यांचे नेतृत्वावर शिक्कामोर्तब केल्याने परिचारक गटाचे वर्चस्व अबाधित राहिले आहे.

## आ. मुनगंटीवार यांनी साताऱ्याचा मानसन्मान ठेवला - मंत्री छ.शिवेंद्रराजे भोसले



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं आधी आपण लंडनला जाऊन बघायचे अन् परत यायचे. ते भारतात आणण्याचे काम आ.सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ही वाघनखं त्यांनी पहिल्यांदा सातारा येथे आणली. सातारा ही मराठ्याची राजधानी होती. भाऊंनी सातारकरांचा मान सन्मान ठेवला. नाहीतर ही वाघनख ते पहिले नागपूरलाही घेऊन जाऊ शकले असते, तो त्यांचा अधिकार ही होता. पण त्यांनी आधी साताऱ्याची ओळख ठेवली. मग वाघनखांचा पुढचा प्रवास सुरू झाला.

सातारकर म्हणून आम्हाला सुधीरभाऊंबद्दल प्रचंड आदर आहे, असे गोरवोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व लातूरचे पालकमंत्री ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी काढले.राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे दिनांक २६ जुलै २०२५ चंद्रपूर येथे आगमन झाले. यावेळी त्यांनी राज्याचे माजी मंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. आ.मुनगंटीवार यांनी आपल्या परिवाराच्यावतीने आणि चंद्रपूरकरांच्यावतीने त्यांचे जोरदार स्वागत केले.

या प्रसंगी आ.मुनगंटीवार परिवाराकडून बांबूपासून साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती आणि लाकडापासून तयार केलेली तलवार देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी ते बोलत होते.याप्रसंगी आ. सुधीर मुनगंटीवार, सपना मुनगंटीवार, आ.देवराव भोंगळे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, माजी आ.अतुल देशकर, जेष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, राहूल पावडे, प्रमोद कडू, राजेंद्र गांधी, विजय राऊत, सुरज पेदूलवार, प्रज्वलंत कडू, डॉ.मंगेश गुलवाडे, अल्काताई आत्राम, किरण बुटले, सविता कांबळे, मीनाताई देशकर, नम्रता ठेमसकर, सर्व तालुका अध्यक्ष, भाजपा शहर व ग्रामीणचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ना. शिवेंद्रराजे पुढे म्हणाले, सुधीरभाऊ फक्त आमदार किंवा माजी मंत्री नाहीत, तर ते आमचे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात आम्ही सर्व जण राज्यात काम करतोय. त्यांचे स्थान आमच्या सर्वांच्या दृष्टीने फार वरचे आणि महत्वाचे आहे. मी सुधीरभाऊंएवढा दांडगा अभ्यास आणि वक्तृत्व शैली आजवर बघितली नाही.

इतिहास आणि वर्तमान स्थितीचा अभ्यास, प्रत्येक विषयाची आकडेवारीनिशी अचूक माहिती, हे भाऊंकडे बघूनही शिकणे शक्य नाही. आपण फक्त प्रयत्न करू शकतो. सुधीरभाऊंकडे बघून जेवढे शिकता येईल, तेवढे शिकण्याचा माझा प्रयत्न असतो. सुधीरभाऊ कुठल्या मंत्र्यांकडे, अधिकाऱ्याकडे किंवा एखाद्या विभागातही गेले. तरी सगळे अलर्ट मोडमध्ये येतात. विधानसभेतही आम्ही बघितलं की सरकारची, मंत्र्यांची चुकही ते दाखवतात, असे ना.शिवेंद्रराजे यांनी सांगितले.

सुधीरभाऊंच्या सुचनेप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील रस्ते, पूल सर्व कामे मार्गी लाऊ, असे आश्वासन देत त्यांनी आ.मुनगंटीवार यांना सातारा येथे प्रतापगड आणि सज्जनगडला येण्याचे निमंत्रण दिले.

यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शिवेंद्रराजे यांनी त्यांच्या चंद्रपूर जिल्हा दौऱ्यात पहिली भेट सुधीर मुनगंटीवार यांची घेतल्याबद्दल त्यांच्या नम्रतेचे कौतुक करीत आभार मानले. आपल्या सहकारी आमदाराच्या घरी जाण्याची इच्छा व्यक्त करणं, हे खरं तर नम्रतेचं आणि मोठेपणाचं लक्षण आहे, असं ते म्हणाले.शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे महत्वाचे खाते आहे. शिवेंद्रराजे यांना चांद्यापासून ते बांद्यापर्यंत रस्ते आणि टनेल बांधायचे आहेत. छत्रपतींच्या मातोश्री आपल्या विदर्भाच्या आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा हे जिजाऊंचे माहेर आहे. आजही तेथे त्यांचा वाडा दिमाखात उभा आहे. तेथे भव्य शिवसृष्टी उभारली जाते आहे, असे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले.

## चिखली फाटा ते तेलंगणा बॉर्डरवर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२६, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील चिखली फाटा ते तेलंगणा सीमारेषा पर्यंतचा मुख्य रस्ता सध्या अक्षरशः खड्ड्यांनी भरलेला आहे. या मार्गाची अवस्था इतकी दयनीय आहे की रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यांतून रस्ता जातो, हेच ओळखणे कठीण झाले आहे. रस्त्याची ही अवस्था वाहनचालकांसाठी जीवघेणी ठरत असून दररोज अपघातांचे प्रमाण वाढत आहे. दुचाकीस्वार, रिक्षा, शालेय वाहने आणि इतर वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती आणखीनच बिकट होत असून, पाणी साचल्याने खड्डे दिसत ही नाहीत. या भागातील नागरिकांनी अनेकदा स्थानिक प्रशासन व जनप्रतिनिधींना तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नागरिकांची मागणी आहे की, तात्काळ या रस्त्याची डागडुजी करून नव्याने डांबरीकरण करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

# संतोष पाटील महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या उपक्रम सप्ताहाचे उद्घाटन

## बुद्धीला कष्टाची जोड दिल्यास जीवन समृद्ध होते - डॉ.हविनाळे

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** जीवनात ध्येय ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. ज्यांना जी आवड आहे त्यात करिअर करावं, बुद्धीला झेपतं ते व्हावं. बुद्धीच्या जोरावर सर्वांगीण विकास होतो. त्यासाठी शिक्षणाची गरज आहे. हाच विचार वंदनीय दी शि.कमळे गुरुजी यांचा होता. त्यासाठी त्यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यात शाळा, महाविद्यालय काढून विशेष करून मुलींच्या, वंचितांच्या शिक्षणाची सोय केली. गुरुजींनी सम ाजकारणातून लोकांना समृद्ध करण्यासाठी शिक्षणाचे माध्यम वापरले. अनेक दानशुरांच्या मदतीने यांच्या माध्यमातून संस्थेचे वैभव उभा केले.

बुद्धीला कष्टाची जोड दिली की, समृद्धीकडे वाटचाल होते. हा विचार मांडून २४ वर्षापूर्वी महाविद्यालय उभा केले, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा सम ाजसेवा मंडळ या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सी.जी.हविनाळे यांनी केले. ते मंद्रूपमधील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सप्ताहाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. महाविद्यालयाचा वर्धापनदिन व नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम ावेळी बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव एम.डी.कमळे, संस्था सहसचिव प्रा.सुबोध कोळी, संस्था विश्वस्त नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ.एम.एन.जगताप. समन्वयक प्रा.डॉ.जवाहर मोरे आदी उपस्थित होते. डॉ.हविनाळे पुढे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी इंग्रजांच्या मदतीने कोल्हापूर संस्थानात सुधारणा केल्या.




शिक्षणाबरोबर सिंचनाची व्यवस्था केल्याने राज्य समृद्ध होण्यास मदत होते. हे जाणून त्यात प्रगती केली. तोच विचारांचा धागा पकडून गुरूजींनी गरीब, वंचितांसाठी शाळा सुरू केल्या. नाही रे वर्गाचा सर्वांगिण विकास व्हावा, हा त्यामागचा विचार होता. यावेळी सचिव एम.डी.कमळे म्हणाले, ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण मिळावे म्हणून गुरुजींनी कॉलेज सुरू केले. अभावग्रस्ततेत शून्यातून विश्व निर्माण करण्याचा प्रयत्न गुरूजींनी केला.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला पुढे नेण्यासाठी महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरूजी यांचा विचार दी.शि.कमळे गुरूजींनी अंगीकारला.शिक्षण हेच ध्येय ठेवून समाजातील दुर्लक्षित घटकाला सबल करून ताकद देण्यासाठी प्रयत्न केले.प्राचार्य डॉ.एम.एन.जगताप म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी एक सर्टिफिकेट मिळणार आहे. कौशल्यावर आधारित घटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विकास साधता येईल. महाविद्यालयात डिजिटल लायब्ररी व हजारोंच्या संख्येने उपलब्ध असलेली पुस्तके, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग यांच्या माध्यतातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधला जात आहे. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सर्व सुविधा जाणून घेत प्रगती करावी. यावेळी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ.एम. एन.जगताप व माजी प्रभारी प्राचार्य डॉ. जे.एल. मोरे यांचा सन्मान करण्यात आला. तासिका तत्त्वारील प्राध्यापकांचेही स्वागत करण्यात आले. सिद्धाराम तरडे या विद्यार्थ्यांने आपले अनुभव कथन केले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.डी.के.देडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डॉ.एल.एम. कट्टिमनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.एम. टी.म्हेत्रे यांनी आभार मानले.

# थोडक्यात

## टाकळीढोकेश्वर येथील रेशन कार्ड कॅम्पसाठी उस्फुर्त प्रतिसाद



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात शासनाची प्रत्येक योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचावी. त्यासाठी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने रेशनकार्ड व बांधकाम कामगार कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये आपली सेवा आपल्याच दारी हा अभिनव उपक्रम सुरू आहे. या उपक्रमासाठी सर्वसामान्य जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आज टाकळी ढोकेश्वर, ढोकी, तिखोल, काकणेवाडी, भोंद्रे परिसरातील ग्रामस्थांसाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या आधीच्या खडकवडी मांडवे खुर्द येथील कॅम्पसाठी देखील ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान या कॅम्पमध्ये नवीन रेशनकार्ड काढणे, रेशनकार्ड ऑनलाईन करणे, आधार कार्ड अपडेट करणे, बांधकाम कामगार कार्ड काढणे, नवीन मतदार नाव नोंदणी करणे, विविध प्रकारचे दाखले, रेशनकार्ड वरील नाव कमी करणे व दुरूस्ती करणे आदि सेवा दिली जाणार आहे. मात्र यासाठी वारंवार तहसील कार्यालयात जाऊन उंबरठे झिजवावे लागतात. मात्र एका हेलपाट्यात काम होईल. ही गॅरंटी देखील नसते मात्र विनाकारण एक दिवस वाया जातो. मात्र बाळासाहेब खिलारी यांनी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात कॅम्प राबवून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या कॅम्पमध्ये एकाच ठिकाणी सर्व कामे करून मिळणार आहे. दरम्यान मांडवे खुर्द येथील या कॅम्पमवेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, माजी सरपंच रावसाहेब झावरे, सरपंच अभिजित झावरे, गंगाधर बांडे, विलास नाईकवाडी, बबन हरिभाऊ बांडे, हभप प्रसाद महाराज खिलारी, बबनराव झावरे, संचालक बबनराव बांडे, गोरक्ष निवडुंगे, युवा नेते योगेश शिंदे, शुभम निवडुंगे, योगेश वाळुंज, लखण ठणगे, ज्ञानदेव पायमोडे, सरपंच अरुणा खिलारी, ग्राम. पं. सदस्या सुग्राबी हवलदार, इंदूबाई पायमोडे, यांच्यासह प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील हास्यात समाधान शोधतो - आमदार दाते




परिसरात खाजगी शाळांमध्ये जाण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध असूनही गोरगरीब व आदिवासी समाजातील मुल कौटुंबिक हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत मलवीर विद्यामंदिर पळशी या शाळेत शिक्षण घेत आहेत. एकुण ३०० विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थी हे दूरवरून चालत शाळेत येतात ह्याची जाणीव असल्यानेच गेल्या ३ वर्षांत ८४ सायकल या शाळेतील विद्यार्थ्यांना आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत. संबंधित योजनांचे प्रस्ताव बनवताना पंढरीनाथ उंडे व संतोष तांबे यांचे ही मोलाचे सहकार्य लाभले.

**– मुख्याध्यापक, श्री.मलवीर विद्यामंदिर पळशी**

**दुर्गम भागातील विद्यार्थिनींसाठी सायकल वाटप**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** शिक्षणप्रवास अधिक सुकर व्हावा. यासाठी गुरेवाडी, खडकवाडी आणि पळशी येथील विद्यार्थिनींना आमदार निधीतून सायकलचे वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील गोरगरीब विद्यार्थीनींच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करताना मला स्वतः ला समाधान मिळतं, असे मत पारनेर-नगरचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले. नुकताच पळशी येथील श्री मलवीर विद्यामंदिर येथे सायकल वितरणाचा कार्यक्रम पार पडला. गुरेवाडी, खडकवाडी व पळशी येथील एकूण ४४ विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. यात फक्त पळशीच्या २७ विद्यार्थिनींना प्रत्यक्ष सायकल देण्यात आल्या.

आमदार दाते म्हणाले की, कन्हेर-पोखरीसारख्या दुर्गम भागात माझे शालेय शिक्षण झाले असल्याने सायकलची गरज आणि ती विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कशी मदत करू शकते, याची जाणीव आहे. म्हणूनच आज शासनाच्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून शिक्षणात अडथळा ठरणाऱ्या गोष्टी दूर करत, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुलभ, सुरक्षित आणि स्वावलंबी बनवण्याचे हे पाऊल असल्याचेही आमदार दाते यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, संस्थेचे संचालक साहेबराव वाफारे, एस.डी. आंधळे, बाळशिराम आंधळे, बी.टी. आंधळे, अनंथा शिर्के, माजी सरपंच संजिवनी आंधळे, तसेच गणेश शिंदे, सुभाष राठोड, अनंत गांधी, भाऊ गागरे, पाराजी मधे, राजाराम मेंगाळ, सिताराम साळवे, कैलास चिकणे, नंदू शिंदे, विकास रोकडे, प्रसाद कर्णावट, अरुण गागरे यांच्यासह शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाघोलीत कारगिल विजय दिवस साजरा

## डॉ.परदेशी यांचे राष्ट्रीय छात्र सेनेसाठी विशेष मार्गदर्शन




**अक्षराज : भूषण बावचीकर**

**दि.२७, वाघोली (पुणे) :** भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली येथील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागातर्फे २६ वा कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. १९९९ साली भारतीय सैन्याने कारगिल युद्धात मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाच्या स्मरणार्थ हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. या निमित्ताने पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे माझी प्राचार्य आणि भारतीय जैन संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रविंद्रसिंह परदेशी यांनी एनसीसी कॅडेट्ससाठी विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. डॉ. परदेशी यांनी १९८३ ते १९८९ या कालावधीत हिमालयातील लडाख, द्रास आणि कारगिल परिसरातील ग्रॅनिटिक व बेसाल्टिक खडकांच्या पेट्रोग्राफी आणि जिओकेमिस्ट्रीवर संशोधन केले आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानात कारगिल युद्धातील भौगोलिक रचना आणि भारतीय सैन्य समोरील आव्हानांवर प्रकाश टाकला. हिमालयातील १७,००० ते १८,००० फूट उंची, उणे ५० अंश सेल्सिअस तापमान, ऑक्सिजनची कमतरता, बर्फाच्छादित प्रदेश आणि उंच शिखरांवर तळ ठोकून बसलेल्या पाकिस्तानी सैनिकांचा भारतीय सैन्याने कसा मुकाबला केला, याचे सविस्तर वर्णन केले. टायगर हिल, टोलोलिंग, पॉइंट ५१४० आणि पॉइंट ४८७५ यासारख्या ठिकाणी भारतीय सैनिकांनी दाखवलेल्या पराक्रम आणि बलिदानाच्या प्रेरणादायी कथा त्यांनी कॅडेट्स समोर मांडल्या. शूर सैनिकांचे बलिदान प्रत्येक भारतीयाच्या हृदयात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करते आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील, असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय गायकवाड यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले, देशाच्या शूरवीरांनी निर्माण केलेला हा वारसा 'आधी कर्तव्य' या भावनेने आणि राष्ट्रसेवेसाठी अतूट निष्ठेने प्रेरित आहे. त्यांचे बलिदान केवळ भावी पिढ्यांसाठीच नव्हे, तर कर्तव्य, सन्मान आणि शौर्याच्या भावनेने संरक्षण दलात सेवा करण्याचा निर्णय घेणाऱ्या तरुणांसाठी ही प्रेरणादायी आहे. त्यांनी एनसीसी कॅडेट्सना देशसेवेचा संदेश दिला. या कार्यक्रमाला एनसीसीचे ९५ कॅडेट्स उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन आणि प्रास्ताविक राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख सब लेफ्टनंट डॉ.शिवाजी सोनवणे यांनी केले. प्रा.सिद्धेश्वर सांगोले, डॉ.सचिन कांबळे, कुणाल वारुळे, गिरीश शहा आणि रामदास बटुळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. सूत्रसंचालन कॅडेट अमृता सावंत यांनी, तर आभारप्रदर्शन लेडिंग कॅडेट रीती गोंड यांनी केले.

कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा आणि बलिदानाचा सन्मान करणारा दिवस असून, या कार्यक्रमाने कॅडेट्समध्ये देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेची भावना बळकट झाली. जय हिंद !

# शौर्याचे स्मरण कारगिल विजय दिनानिमित्त नवनागापूर येथे अभिवादन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची आठवण जागविन्याच्या उद्देशाने दिनांक २६ जुलै २०२५ रोजी नवनागापूर, अहिल्यानगर येथे वीर सैनिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणाऱ्या या कार्यक्रमास पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते उपस्थित होते.

यावेळी आमदार दाते यांनी सांगितले की, कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैन्याच्या शूर अधिकाऱ्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कारगिल विजय दिवस' देशभरात साजरा करण्यात येतो. याच दिवशी भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरीत परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. कारगिलच्या शहिदांचे सन्मानाने स्मरण करण्याबरोबरच, देशातील सैनिकांचा आदर करण्याचा हा दिवस असतो. देशासाठी शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची व बलिदानाची आठवण करून आपली देशभक्ती जागृत करण्यासाठी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने नवनागापूर येथे कृतज्ञतेची भावना जागवणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते ही अभिमानाची बाब आहे.




भारतीय सैन्याचा आदर्श डोळ्यांसम ोर ठेवून आपण देशहितासाठी कार्य करणे आवश्यक असून त्यांनी केलेल्या त्यागाबद्दल आपण सर्वांनी कृतज्ञता व्यक्त करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. यावेळी उपस्थित सर्व आजी-म ाजी सैनिक व नागरिकानी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार आमदार दाते यांनी शहीद जवानांच्या स्मारकासाठी ५ लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द देत कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांच्या पावन स्मृतीस अभिवादन केले. शौर्य, बलिदान आणि देशभक्तीची अमर कथा म्हणजे कारगिल विजय दिवस असून हा दिवस संपुर्ण देश बांधवांसाठी अभिमानाचा दिवस असल्याचे दाते यांनी सांगितले.

# प्रोटीन आणि ईगल लाईव्हलिवूड मार्फत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** प्रोटीन आणि ईगल लाईव्हलिवूड यांच्या संयुक्त विद्यामाने शहापूर तालुक्यातील आदीवली या गावात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. या फाउंडेशनने ३० कलमी आंबे लावून वृक्षारोपण संवर्धना व बदलत्या हवामाना विरोध लढ्यात म हत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रोटीनच्या ३० कर्मचाऱ्यांनी ४ तासांचा मौल्यवान वेळ देऊन व स्थानिक शेतकऱ्यांच्या व लाभार्थ्यांच्या सहभागाने हा कृषी वनीकरण उपक्रम कार्बन जप्तीला प्रोत्साहन देणारा ठरला. यामुळे ग्रामीण समुदायाला आर्थिकदृष्ट्या प्रबल होण्यासाठी मदत होणार असल्याचे ईगलचे संस्थापक निल रतन शेंडे यांनी सांगितले. याप्रसंगी प्रोटीनचे वरिष्ठ प्रशांत घोडखे, स्नेहा पवार अनेक फाउंडेशनचे सभासद उपस्थित होते.

# के.एम.असगर हुसेन कनिष्ठ महाविद्यालयात पालक सभेचा आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, अकोला :** यावर्षीच्या पहिल्या पालक सभेचे आयोजन दिनांक २६ जुलै २०२५ रोजी के.एम.असगर हुसेन कनिष्ठ महाविद्यालय स्थानिक रतनलाल प्लॉट येथे आहे. प्राचार्य इम्तियाज अहमद खान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयीन प्रभारी प्राध्यापक मोहम्मद रफिक यांची प्रमुख उपस्थिती होती. तर व्यासपीठावर प्रा.मतीन अहमद खान, प्रा.मोहम्मद परवेझ अख्तर, प्रा.मिर्झा खालिद रझा, प्रा.मोहम्मद अनीस, प्रा.कमरुन्निसा, प्रा.मुतीब शरीक यांची विशेष उपस्थिती होती. ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयातील हा टर्निंग पॉइंट त्यांच्या आयुष्यासाठी आणि चांगले करिअर घडवण्यासाठी खूप महत्त्वाचा असतो. त्यामुळे पालकांनी




आपल्या मुलांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. जेणेकरून या २ वर्षांचा उपयोग त्यांचे आयुष्य यशस्वी करण्यासाठी करता येईल, असे प्रा.मोहम्मद रफिक, प्रा.मिर्झा खालिद रझा यांनी कनिष्ठ महाविद्यालयात होत असलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली तर प्रा.मोहम्मद परवेझ अख्तर यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य इम्तियाज अहमद खान यांनी सर्व विद्यार्थी व पालकांना या दोन वर्षांचा उपयोग आपले उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात ११वी सायन्स वर्गातील विद्यार्थी हाफिज उजेर अहमद हुसेन कुरेशी यांनी कुराण ई पाकच्या पठणाने केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.सय्यद मोहसीन अली यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.मतीन अहमद खान यांनी केले. प्राध्यापक डॉक्टर मोहम्मद नदीम यांनी सर्व शिक्षकांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.मतीन अहमद खान यांच्या मार्गदर्शनाखाली ११ वी व १२ वी च्या सर्व वर्ग शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.नजमुद्दीन खान, प्रा.नावेद अहमद खान, प्रा.शाहिद इक्बाल, प्रा.इंतेखाब आलम खान, प्रा.डॉ.झाकिरुल्लाह खान, प्रा.नावेद अर्शद, प्रा.डॉ.शीबा अल्मास, प्रा.शोएब उर रहमान, प्रा.दानीशुद्दीन खान, प्रा.जिब्रान खान आदी उपस्थित होते.